बालकांचा मोफत व सक्तीच्या
शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९
सर्व शाळांमधील इयत्ता व तुकडयानिहाय पटसंख्या व त्यावर आधारित शिक्षक प्रवर्गातील पदांची निश्चिती.

# महाराष्ट्र शासन

**शासन परिपत्रक क्र.पीआरई-२०१०/प्रक्र.२२५/प्राशि-१**
**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२**
**दिनांक १८ जून, २०१०**

**वाचा :** १) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९.

२) शासन परिपत्रक क्रमांक विकाक २००९/प्र.क्र.२२२/प्राशि-५, दि. १० मे, २०१०.

**प्रस्तावना:-** केंद्र सरकारने सन २००२ च्या ८६ व्या संविधान विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद २१ (अे) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, Right of Children to Free and Compulsory Education Act, २००९ (No. ३५, २००९), केंद्र शासनाने पारित करून तो भारत सरकारच्या २७/०८/२००९ च्या राजपत्रात प्रसिद्ध केला आहे. तसेच, भारत सरकारच्या दिनांक १६/०२/२०१० च्या राजपत्रात सदर अधिनियम दिनांक ०१/०४/२०१० पासून संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मिर वगळता) लागू केला असल्याचे नमूद केले आहे.

२. समता, सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये, सर्व मुलांच्या प्राथमिक शिक्षणाच्या माध्यमातून साधली जाऊ शकतात. यादृष्टीने हा अधिनियम अंमलात आणला आहे. त्यामुळे सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण पुरविण्याची, त्यांना शाळांमध्ये प्रवेश देण्याची, उपस्थितीची आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली आहे.

**परिपत्रक :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ दिनांक १ एप्रिल, २०१० पासून लागू झाला आहे. अधिनियमातील कलम क्र.२५ (१) अनुसार अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, प्रत्येक शाळेत, अनुसूचीत

विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे विद्यार्थी-शिक्षक प्रमाण राखणे अनिवार्य झाले आहे. या प्रयोजनासाठी कोणताही शिक्षक अन्य कोणत्याही शाळेत अथवा कार्यालयात काम करीत नाही, तसेच शाळेतील शिक्षकाची पदे एकूण मंजूर पदापेक्षा १० टक्क्यांपेक्षा अधिक रिक्त राहणार नाहीत याबाबतची खात्री करुन घेणे आवश्यक झाले आहे.

प्रचलित कार्यपध्दतीनुसार प्रतिवर्षी ३० सप्टेंबर या दिनांकास राज्यातील सर्व शाळांतील विद्यार्थी संख्येची पटनिश्चिती करुन त्यावर आधारित मान्य शिक्षक संख्या निर्धारित केली जाते. त्यानंतर क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन केले जाते.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदी विचारात घेऊन यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करावी -

१. दिनांक ३० सप्टेंबर, २००९ ही आधारभुत तारीख मानून राज्यातील सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांची EMIS (Educational Management Information System) नमुन्यात माहिती भरली असून ती सर्व गटशिक्षणाधिकारी / महानगरपालिकांचे प्रशासन अधिकारी / शिक्षणाधिकारी / शिक्षण प्रमुख यांच्याकडे उपलब्ध आहे. या माहितीच्या आधारे गटशिक्षणाधिकारी / महानगरपालिकांचे प्रशासन अधिकारी / शिक्षणाधिकारी / शिक्षण प्रमुख यांनी सदरहू माहिती अचूक असल्याबद्दल संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांकडून खात्री करुन घ्यावी. उपलब्ध माहितीत बदल असल्यास त्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा कराव्यात.

२. उक्त सुधारित माहितीच्या आधारे **परिशिष्ट-अ** मध्ये दिलेल्या प्रपत्रात इयत्तानिहाय पटसंख्या स्तंभ क्र. २ मध्ये लिहावी.

३. अ) प्राथमिक शाळेसाठी मंजूर असलेल्या शिक्षकांच्या पदांची माहिती परिशिष्ट-अ मधील प्रपत्रातील स्तंभ क्र. ३, ४ व ५ मध्ये भरावी. प्रचलित निकषानुसार प्राथमिक शाळांमध्ये मुख्याध्यापकाचे पद हे एकूण मंजूर शिक्षक संख्येतच धरण्यात येते. परंतु, ही माहिती भरताना ज्या शाळेला मुख्याध्यापकाचे स्वतंत्र पद मंजूर आहे त्या शाळेसाठी स्तंभ क्र. ३ मध्ये मंजूर शिक्षक पदांची संख्या देताना मुख्याध्यापकाचे पद वगळून शिक्षकांच्या पदांची संख्या नमूद करावी.

ब) माध्यमिक शाळांतील इयत्ता ८ वी पर्यंतची माहिती EMIS मध्ये घेत असल्याने मान्य तुकड्यांच्या आधारे मंजूर शिक्षकांची पदनिश्चिती करावी. पदनिश्चितीसाठी मंजूर शिक्षक संख्या = इयत्ता ५ वी ते ७ वी च्या तुकड्यांची संख्या X १.४ + इयत्ता ८ वी च्या तुकड्यांची संख्या X १.५ हे सूत्र वापरावे. या सूत्राप्रमाणे पदनिश्चिती केल्यानंतर ही माहिती **परिशिष्ट-अ** मधील प्रपत्रातील स्तंभ क्र. ३, ४ व ५ मध्ये भरावी.

४. **परिशिष्ट-क** मध्ये अधिनियमातील अनुसूचीमध्ये शाळेसाठी शिक्षक प्रवर्गातील पदे मंजूर करण्यासाठीचे निकष आणि मानके दिलेली आहेत. त्याआधारे अनुसूचीतील निकषांनुसार मान्य होणारी शिक्षक, मुख्याध्यापक, अंशकालीन शिक्षक पदे निश्चित करून **परिशिष्ट-अ** मधील प्रपत्रातील स्तंभ क्र. ६, ७ व ८ मध्ये ही माहिती भरावी.

५. **परिशिष्ट-अ** मधील प्रपत्रातील स्तंभ क्र. ३, ४ व ५ आणि ६, ७ व ८ यामधील फरकाच्या आधारे स्तंभ क्र. ९ ते १४ मध्ये योग्य त्या ठिकाणी नोंदी कराव्यात.

६. **परिशिष्ट-अ** मधील शाळा स्तरावरील माहितींचे संकलन **परिशिष्ट-ब** मध्ये करावयाचे आहे. **परिशिष्ट-ब** मध्ये महानगरपालिका क्षेत्र आणि जिल्हा स्तरावर स्वतंत्रपणे संकलन होईल. महानगरपालिका क्षेत्रासाठी शहर साधन केंद्र व त्यानंतर महानगरपालिका क्षेत्र याक्रमाने, तर जिल्ह्यासाठी तालुका व त्यानंतर जिल्हा याक्रमाने संकलन होईल. **परिशिष्ट-ब** मध्ये देण्यात आलेले प्रपत्र हे शहर साधन केंद्र / महानगरपालिका / तालुका / जिल्हा / राज्य या सर्व स्तरांवरील माहिती संकलनासाठी वापरावे. प्रपत्र भरताना लागू स्तरासाठी '√' अशी खूण करावी.

७. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी महानगरपालिका आणि जिल्हा स्तरावरील प्रपत्रांचे संकलन करून त्याआधारे राज्याची माहिती **परिशिष्ट-ब** मध्ये तयार करावी. सदर माहितीच्या आधारे एकूण व्यवस्थापन व प्रवर्गनिहाय शिक्षक प्रवर्गाच्या मागणीबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा. सदर प्रस्ताव सादर करताना वाढीव पदांचा आर्थिक भार परिगणित करून त्याचा लेखाशीर्षनिहाय तपशील स्पष्टपणे नमूद करावा. आवश्यकतेनुरूप वाढीव खर्चासाठी नवीन बाबींचा किंवा पूरक मागणीचा प्रस्ताव सादर करावा.

**शिक्षकांचे समायोजन :**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ मधील कलम २५ अनुसार दिनांक ३० सप्टेंबर, २०१० पूर्वी राज्यातील प्रत्येक शाळेत या अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे विद्यार्थी शिक्षक प्रमाण राखण्याबाबत जास्तीत जास्त प्रयत्न करावेत. त्यासाठी संबंधित व्यवस्थापनाकडे उपलब्ध शिक्षकांचे समायोजन समतोलरित्या होईल हे कटाक्षाने पहावे. तसेच विद्यार्थी-शिक्षक प्रमाण राखण्याच्या प्रयोजनासाठी शाळेत पदस्थापित केलेला कोणताही शिक्षक इतर कोणत्याही शाळेत / कार्यालयात काम करणार नाही. तसेच त्यास दशवार्षिक जनगणना, आपत्ती निवारणाची कामे किंवा स्थानिक प्राधिकरण, राज्य विधान सभा व लोकसभा निवडणूकांच्या कर्तव्याखेरीज इतर कोणतेही शिक्षणेतर काम देण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे शासकीय, स्थानिक प्राधिकरणाच्या व अनुदानित शाळांमधील एकूण मंजूर शिक्षक पदसंख्येच्या १० टक्क्यांपेक्षा अधिक शिक्षकांची पदे रिक्त राहणार नाहीत याची खात्री करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर (www.maharashtra.Gov.in) उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१००६१८१७४६३०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ना.ऊ.रौराळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा. मंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व).
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व).
मा. मुख्यसचिव, यांचे स्वीय सहाय्यक.
मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण), यांचे स्वीय सहाय्यक.
सर्व प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.

# परिशिष्ट - अ
## अधिनियमातील अनुसूचीप्रमाणे शिक्षक प्रवर्गातील
## आवश्यक असणारी पदे व शाळेसाठी सध्या मंजूर असलेली पदे

जिल्हा : तालुका : समूह साधन केंद्र :

शाळेचे नाव :

शाळेचे माध्यम : शालेय व्यवस्थापन :* जि.प. / न.पा. / न.प. / म.न.पा. / खा.अ. / खा.वि.अ.

शाळेचा प्रवर्ग : प्राथमिक / माध्यमिक शाळेचा सर्वात खालचा वर्ग : शाळेचा सर्वात वरचा वर्ग :

| इयत्ता | पटसंख्या | प्रचलित निकषानुसार मंजूर शिक्षक संख्या | | | अनुसूचीतील निकषानुसार आवश्यक शिक्षक संख्या | | | ज्यादा शिक्षकांची गरज | | | अतिरिक्त शिक्षक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शिक्षक | मुख्याध्यापक | अंशकालीन शिक्षक | शिक्षक | मुख्याध्यापक | अंशकालीन शिक्षक | शिक्षक | मुख्याध्यापक | अंशकालीन शिक्षक | शिक्षक | मुख्याध्यापक | अंशकालीन शिक्षक |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. |
| १ ली ते ५ वी | | | | | | | | | | | | | |
| ६ वी | | | | | | | | | | | | | |
| ७ वी | | | | | | | | | | | | | |
| ८ वी | | | | | | | | | | | | | |
| एकूण ६ वी ते ८वी | | | | | | | | | | | | | |
| एकूण १ ली ते ८वी | | | | | | | | | | | | | |

* जिल्हा परिषद / नगर पालिका / नगर परिषद / महानगर पालिका / खाजगी अनुदानित / खाजगी विना अनुदानित

परिशिष्ट-ब

# अधिनियमातील अनुसूचीप्रमाणे शिक्षक प्रवर्गातील आवश्यक असणारी पदे व शाळेसाठी सध्या मंजूर असलेली पदे

शहर साधन केंद्र / महानगरपालिका / तालुका / जिल्हा / राज्य :

| शाळेचा प्रवर्ग | शालेय व्यवस्थापन | पटसंख्या | प्रचलित निकषानुसार मंजूर शिक्षक संख्या | | | अनुसूचीतील निकषानुसार आवश्यक शिक्षक संख्या | | | ज्यादा शिक्षकांची गरज | | | अतिरिक्त शिक्षक | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | शिक्षक | मुख्याध्यापक | अंशकालीन शिक्षक | शिक्षक | मुख्याध्यापक | अंशकालीन शिक्षक | शिक्षक | मुख्याध्यापक | अंशकालीन शिक्षक | शिक्षक | मुख्याध्यापक | अंशकालीन शिक्षक |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. |
| प्राथमिक | जि.प. | | | | | | | | | | | | | |
| | न.पा. | | | | | | | | | | | | | |
| | न.प. | | | | | | | | | | | | | |
| | म.न.पा. | | | | | | | | | | | | | |
| | खा.अ. | | | | | | | | | | | | | |
| | खा.वि.अ. | | | | | | | | | | | | | |
| एकूण (प्राथमिक) | | | | | | | | | | | | | | |
| माध्यमिक | जि.प. | | | | | | | | | | | | | |
| | न.पा. | | | | | | | | | | | | | |
| | न.प. | | | | | | | | | | | | | |
| | म.न.पा. | | | | | | | | | | | | | |
| | खा.अ. | | | | | | | | | | | | | |
| | खा.वि.अ. | | | | | | | | | | | | | |
| एकूण (माध्यमिक) | | | | | | | | | | | | | | |
| एकूण (प्राथ. + माध्य.) | | | | | | | | | | | | | | |

टीप : याच नमुन्यात शहर साधन केंद्र / महानगरपालिका / तालुका / जिल्हा / राज्य स्तरावरील संकलन होईल. संबंधित लागू बाबींसाठी √ अशी खूण करावी.

# परिशिष्ट - क
## अनुसूची

**शाळेसाठी शिक्षक प्रवर्गातील पदे मंजूर करण्यासाठीचे निकष आणि मानके -**

| अ.क्र. | इयत्ता | प्रवेश देण्यात आलेली मुले | शिक्षकांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | पहिली ते पाचवीच्या वर्गासाठी | साठ पर्यंत | दोन |
| | | एकसष्ठ ते नव्वद पर्यंत | तीन |
| | | एक्याण्णव ते एकशेवीस पर्यंत | चार |
| | | एकशे एकविस ते एकशेपन्नास पर्यंत | पाच |
| | | एकशे पन्नासहून अधिक | पाच आणि एक मुख्याध्यापक |
| | | दोनशेहून अधिक | विद्यार्थी-शिक्षक (मुख्याध्यापक वगळून) यांचे प्रमाण चाळीस पेक्षा अधिक नसेल |
| २. | सहावी ते आठवीच्या वर्गासाठी | १) प्रत्येक वर्गासाठी किमान एक शिक्षक, जेणेकरुन<br>(अ) विज्ञान व गणित,<br>(ब) सामाजिक अभ्यास,<br>(क) भाषा<br>**४। प्रत्येक विषयासाठी किमान एक शिक्षक असेल** | |
| | | २) प्रत्येक पस्तीस मुलांसाठी एक शिक्षक | |
| | | **३) शंभराहून अधिक मुलांना प्रवेश दिला जातो तेथे -**<br>(अ) पूर्णवेळ मुख्याध्यापक.<br>**पुढील विषयांसाठी प्रत्येकी एक अंशकालीन निदेशक**<br>(१) कलाशिक्षण,<br>(२) आरोग्य व शारिरिक शिक्षण,<br>(३) कार्यशिक्षण (कार्यानुभव) | |